**<u>ठळक बातम्या</u>**

- रेल्वे फाटक मुक्त महाराष्ट्र करण्यासाठी येत्या तीन वर्षात १४५ रेल्वे उडाण पुल बांधण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची घोषणा

- मोशी कचरा डेपो दुर्घटनेतल्या मृतांची संख्या ९ वर, बचावकार्य थांबलं

- ५६व्या भौतिकशास्त्र ऑलिम्पियाडमध्ये भारताच्या पाच विद्यार्थ्यांना सुवर्णपदक /मुंबईचा श्रेष्ठ सुरैया, पुण्याचा कनिष्क जैन यांचा समावेश

**आणि**

- राज्यात मान्सूनची गती मंदावल्यानं अनेक भागांमध्ये पावसाची प्रतीक्षा कायम, येत्या काही दिवसांत पावसाचं प्रमाण कमी राहण्याच अंदाज

**<><><><><><>**

रेल्वे फाटक मुक्त महाराष्ट्र करण्यासाठी येत्या तीन वर्षात १४५ रेल्वे उडाण पुलांचं बांधकाम केलं जाईल अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज नागपूर इथं केली. वर्धमाननगर इथं रेल्वे क्रॉसिंगवर चार पदरी रोड, ओवर ब्रिज तसंच ४८४ कोटी रुपयांच्या ९ महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधांचं लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. रेल्वे फाटकाअभावी दरवर्षी २१ हजार लोकांचा मृत्यू होतो त्यामुळे या कामाला प्राधान्य दिलं आहे, असं ते म्हणाले. या कार्यक्रमाला केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी उपस्थित होते. महारेलच्या स्थापनेमुळे रेल्वेच्या पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना मिळाली आहे, आणि मेट्रो प्रकल्पामुळे नागपूरचा गौरव वाढला आहे, असं नितीन गडकरी यावेळी म्हणाले.

नागपूर महापालिकेच्या महर्षी सुदर्शन वाल्मिकी वसाहत आणि प्रधानमंत्री आवास शहरी योजना २ अंतर्गत स्वप्नपूर्ती सदनिका प्रकल्पांचं भूमीपूजनजनही आज गडकरी आणि फडनवीस यांच्या उपस्थितीत झालं.

सफाई कर्मचाऱ्यांसह समाजातल्या प्रत्येक घटकाच्या आर्थिक, सामाजिक उन्नतीसाठी राज्य सरकार, महापालिका कटिबद्ध आहे. महानगराच्या वाढत्या गरजा आणि आव्हानं लक्षात घेता लवकरच लाड- पागे समितीच्या शिफारसींनुसार सुमारे ५०० जणांना नियुक्तीचे आदेश निर्गमित केले जात असल्याचं फडनवीस यांनी यावेळी सांगितलं. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वित्त राज्यमंत्री ॲडव्होकेट आशिष जयस्वाल, यावेळी उपस्थित होते.

या समाजाने आता आधुनिक काळाच्या गरजा लक्षात घेऊन आदरातिथ्य उद्योग क्षेत्रात पदार्पण करावं, छोट्या-छोट्या कंपन्या सुरु करुन सेवा पुरवाव्या आणि रोजगारांची निर्मिती करावी, असं आवाहन गडकरी यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

पिंपरी-चिंचवडमधे मोशी कचरा डेपो इथं झालेल्या दुर्घटनेत चौथ्या दिवशीच्या शोध मोहीमेत रात्री आढळून आलेल्या एका नागरिकाचाही मृत्यू झाला आहे. त्यामुळे या दुर्घटनेतल्या मृतांची संख्या ९ झाली आहे. या दुर्घटनेतल्या सर्व नागरिकांचा शोध पूर्ण झाल्यानं बचावकार्य थांबवण्यात आलं आहे.

या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबांना ४० लाख रुपयांची आर्थिक मदत केली जाणार आहे. यामध्ये पिंपरी चिंचवड पालिकेकडून १० लाख, राज्य शासनाकडून पाच लाख आणि ठेकेदार कंपनीकडून २५ लाख रुपयांची मदत दिली जाणार असल्याचं महापौर रवी लांडगे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

केंद्र आणि राज्य शासन नागरिकांच्या आरोग्यदायी जीवनासाठी विविध योजनांच्या माध्यमातून काम करत आहे. त्याचा लाभ नागरिकांना होत आहे. मात्र,

निरोगी जीवनासाठी योग, पर्यावरणपूर्वक जीवनशैलीही आवश्यक आहे, असं लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला म्हणाले. नाशिकच्या अशोका हेल्थ सिटी आणि अशोका महिला आणि बाल रुग्णालयाचं लोकार्पण आज सायंकाळी लोकसभा अध्यक्ष  बिर्ला यांच्या हस्ते झालं. त्यावेळी ते बोलत होते.  कोरोना काळात महाराष्ट्रात विकसित केलेली लस उपयोगात आली. नवं संशोधन, नवं तंत्रज्ञान याच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण केंद्रं उभारली गेली पाहिजेत, असंही बिर्ला म्हणाले. अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, राजस्थानचे ऊर्जा राज्यमंत्री हिरालाल नागर, खासदार राजाभाऊ वाजे, खासदार डॉ. शोभा बच्छाव,  यांच्यावह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

कोलंबियामध्ये बुकारामांगा इथं ५ ते १२ जुलै दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या ५६ व्या आंतरराष्ट्रीय भौतिकशास्त्र ऑलिम्पियाड २०२६ मध्ये भारताच्या पाच विद्यार्थ्यांनी सुवर्णपदकं पटकावली. मुंबईचा श्रेष्ठ सुरैया, पुण्याचा कनिष्क जैन, मध्य प्रदेशमध्ये इंदूर इथला रिद्धेश बेंडाळे, नवी दिल्लीतल्या द्वारका इथला ऋषित गर्ग आणि गुजरातमधल्या  अहमदाबाद इथला स्वरित जोशी या विद्यार्थ्यांचा यात समावेश आहे. स्पर्धेच्या देशनिहाय पदकतालिकेत, भारत, चीन, कझाकस्तान, रशिया, दक्षिण कोरिया आणि तैवान हे देश संयुक्तपणे पहिल्या स्थानावर होते.

मुंबईच्या होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र-टाटा मूलभूत संशोधन संस्थेचे प्राध्यापक अन्वेश मुझुमदार, आणि मुंबईच्या सेंट झेवियर्स महाविद्यालयाच्या डॉ. लीना जोशी यांनी भारतीय संघाचं   प्रतिनिधित्व केलं. या स्पर्धेत ८५ देशांचे एकूण ३८१ वियार्थी सहभागी झाले होते.

**<><><><><>**

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर महिलांसाठीच्या शासनाच्या विविध योजना, महिला सक्षमीकरण, महिला सुरक्षा तसंच महिलांच्या हक्कांविषयीची माहिती प्रभावीपणे पोहोचविण्याच्या उद्देशानं "महिला उन्नती वारी" उपक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. अधिकाधिक महिलांनी याचा लाभ घ्यावा; तसंच महिला वारकऱ्यांनी आरोग्य तपासणी करुन घ्यावी, असं आवाहन महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केलं आहे.

"महिला उन्नती वारी २०२६" ह्या विशेष उपक्रमाचा शुभारंभ उरळी कांचन इथं झाला, त्यावेळी तटकरे बोलत होत्या. महिला आणि बालविकास विभाग तसंच महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांनी संयुक्तपणे या उपक्रमाला सुरवात केली आहे.

**<><><><><>**

आषाढी एकादशीच्या निमीत्तानं पंढरपुरकडे निघालेली संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या पालख्या पुण्यातला मुक्काम संपवून पुढे मार्गस्थ झाल्या आहेत.

**<><><><><>**

इंग्लंड आणि भारताच्या महिला क्रिकेट संघात लॉर्ड्स इथं सुरु असलेल्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या दुसऱ्या डावात भारताची एकूण आघाडी ४०० धावांच्या पलिकडे गेली आहे.

आज तिसऱ्या दिवशी भारतानं आपला दुसरा डाव कालच्या १ बाद १५४ धावांवरून पुढे सुरु केला. मात्र स्मृती मंधना आणि तिच्यानंतर आलेल्या जेमीमा तसंच हरमनप्रीत लवकर बाद झाल्या. त्यानंतर यास्तिका हीनं वैयक्तिक शतकासह दीप्ती शर्मासोबत अर्धशतकी भागिदारी करत भारताच्या डावाला आकार दिला. यास्तिका ११३ धावा करून बाद झाली.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या दुसऱ्या डावात ७ बाद ३०३ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

विम्बल्डन टेनिस अजिंक्यपद स्पर्धेच्या महिला एकेरीत २१ वर्षाच्या लिंडा नॉस्कोव्हा हिनं अजिंक्यपदाला गवसणी घातली. काल झालेल्या अंतिम सामन्यात तिनं कॅरोलाइना मुकोव्हा हिच्यावर ६-२, ५-७, ६-३ असा पराभव केला आणि कारकीर्दीतलं पहिलंवहिलं ग्रँडस्लॅम जेतेपद पटकावलं. पुरुष एकेरीत आज संध्याकाळी अग्रमानांकित आणि विद्यमान विजेता यानिक सिनरचा सामना अलेक्झांडर झ्वेरेव्हशी होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार साडे आठ वाजता सामन्याला सुरुवात होईल.

<><><><><>

येमेन मध्ये जाणाऱ्या भारतीय नागरिकांसाठी २०१७ मध्ये लागू केलेल्या अटींबाबतची अधिसूचना परराष्ट्र मंत्रालयाने मागे घेतली आहे. येमेनमधलं युद्ध आणि सशस्त्र संघर्षामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, भारतीय नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी ही अधिसूचना जारी करण्यात आली होती.

<><><><><>

कर्नाटक मध्ये बेकायदेशीर वास्तव्य करणाऱ्या दोन पाकिस्तानी नागरिकांना पोलिसांनी आज चिक्कबल्लापूर इथून अटक केली. या दोघांनी आपलं खरं नागरिकत्व लपवून अवैधरीत्या शिधा पत्रिका आणि मतदार ओळखपत्र देखील मिळवलं होतं, अशी माहिती पोलिसांनी दिली.

<><><><><>

राज्यात मान्सूनची गती मंदावल्यानं अनेक भागांमध्ये पावसाची प्रतीक्षा कायम आहे. राज्यात येत्या काही दिवसांमध्ये पावसाचं प्रमाण तुलनेनं कमी राहील अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. कोकण, गोवा आणि घाटमाथ्यावर काही

भागांत मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल, तर तुरळक ठिकाणी जोरदार सरी पडतील. मध्य महाराष्ट्रात हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल, तर विदर्भात काही ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडेल, आणि जोरदार वारे वाहतील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**<><><><><>**

परदेशी गुंतवणूकदारांनी सलग चार महिन्यांनंतर भारतीय शेअर बाजारात गुंतवणुकीवर भर दिला असून, जुलै महिन्यात आतापर्यंत १५ हजार १५७ कोटी रुपयांची गुंतवणूक केल्याचं परदेशी गुंतवणूकदार संस्थेच्या ताज्या अहवालात म्हटलं आहे. जागतिक सेमीकंडक्टर उद्योगातल्या मंदीमुळे गुंतवणूकदारांनी आपल्या गुंतवणुकीचा काही भाग उदयोन्मुख बाजारपेठांकडे वळवल्याचं यात म्हटलं आहे. देशांतर्गत स्थूल-आर्थिक निर्देशकातली सुधारणा, कच्च्या तेलाच्या स्थिर किमती आणि तिमाही लाभाचे दमदार अहवाल, यामुळेही खरेदीचा कल बळकट झाल्याचं यात म्हटलं आहे.

दरम्यान, सरकारने करविषयक धोरणांमध्ये बदल केल्यामुळे देशाच्या कर्जरोखे बाजाराकडे परदेशी गुंतवणुकीचा ओघ वाढल्याचं या अहवालात म्हटलं आहे.

**<><><><><>**

राज्य शासनाचा कृषी विभाग आणि कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा म्हणजेच आत्मा यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी आयोजित केल्या जाणाऱ्या विविध प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत बीड जिल्ह्यातले काही शेतकरी गुजरात मध्ये आणंद इथं गेले आहेत. या तीन दिवसीय निवासी प्रशिक्षण कार्यक्रमात त्यांना दुधोत्पादन, जनावरांचं आरोग्य, गोठा व्यवस्थापन आणि दुग्धजन्य पदार्थ विक्री व्यवस्थापन या विषयांवर तज्ञ व्यक्ती मार्गदर्शन करणार आहेत.

**<><><><><>**

केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाचे महासंचालक प्रवीर रंजन यांनी आज जम्मू काश्मीर मध्ये पहलगाम इथल्या ‘नुवान’ बेस कॅम्पला भेट दिली आणि सध्या सुरु असलेल्या अमरनाथ यात्रेतल्या सुरक्षा स्थितीचा आढावा घेतला. रंजन यांनी तैनात असलेली सुरक्षा प्रणाली, प्रवेश नियंत्रण उपाय, संवाद यंत्रणा, देखरेख व्यवस्था, वैद्यकीय सहाय्य, सर्व सुरक्षा दलांमधली समन्वय यंत्रणा. त्यांनी तैनातीची महत्त्वाची ठिकाणं, तपासणी नाके, सीआरपीएफचं संपर्क केंद्र, सीसीटीव्ही नियंत्रण कक्ष आणि साधनसामग्रीच्या व्यवस्थेचीही पाहणी केली.

**<><><><><>**

व्हिएतनाममधल्या ‘फु क्वोक’ बेटाजवळ काल झालेल्या बोट दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या भारतीय नागरिकांचे मृतदेह ‘हो ची मिन्ह सिटी’ इथं नेले जात असून, आवश्यक ती कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यावर ते भारतात पाठवले जातील असं व्हिएतनाममधल्या भारतीय दूतावासानं आज समाज माध्यमावरच्या संदेशामधून सांगितलं. भारतीय दूतावास व्हिएतनामी अधिकाऱ्यांशी समन्वय साधून ही प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न करत असल्याचं यात म्हटलं आहे. या अपघातात सुरक्षित राहिलेले १५ जण उपचारानंतर भारतात परत येत आहेत, तर एक जण उपचार घेत आहे, असं यात म्हटलं आहे.

**//<><><><><>//**